# QUICK NEWS

## गोळीबारात जखमी चालकाचा मृत्यू

मुंबई. धारावीत शनिवारी ऑटो रिक्षा चालकावर गोळीबार करण्यात आला होता. उपचारादरम्यान रविवारी त्यांचा मृत्यू झाला. धारावी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. या गंभीर प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा करत आहे. शनिवारी सकाळी ११.१५ वाजता धारावीतील मिठी नदीजवळील पिवळा बंगला परिसरात ऑटो रिक्षाचालक अमीर अनीस खान (३०) यांची अज्ञातांनी गोळ्या झाडून हत्या केली. त्यांना गंभीर अवस्थेत सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे रविवारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. धारावी पोलीस ठाण्याच्या तपास अधिकाऱ्याने सांगितले की, गोळीबारप्रकरणी आम्ही एका महिलेची चौकशी करत आहोत. खान यांच्यावर गोळीबार करणाऱ्या हल्लेखोरांना पकडण्यासाठी अनेक पथके तयार करण्यात आली आहेत. पोलिसांना आरोपींचा सुगावा लागला आहे. त्याआधारे दोघेही आरोपींना पकडण्यासाठी ठिकठिकाणी छापे टाकत आहेत.

## कांदिवलीत फुफ्फुस रिहॅबिलिटेशन केंद्र

मुंबई. आंबेडकर हॉस्पिटलमध्ये श्वसनाचे आजार असलेल्या रुग्णांची कमकुवत फुफ्फुसे मजबूत करण्याचे काम केले जाणार आहे. महापालिकेने कांदिवली येथे फुफ्फुस रिहॅबिलिटेशन केंद्र सुरू केले आहे. शिवडी येथील पालिकेच्या क्षयरोग रुग्णालयानंतर आंबेडकर हे दुसरे रुग्णालय आहे. महापालिकेच्या क्षयरोग नियंत्रण विभागाच्या प्रभारी डॉ. प्रणिता टिपरे यांनी सांगितले की, टीबी, दमा यासारख्या श्वसनाच्या आजारांनी त्रस्त असलेल्या लोकांच्या फुफ्फुसांना मोठ्या प्रमाणात नुकसान होते, त्यामुळे त्यांना अनेकदा श्वास घेण्यास त्रास होतो. या केंद्रात त्यांची फुफ्फुसे मजबूत व्हावीत यासाठी त्यांना विविध प्रकारचे व्यायाम दिले जाणार आहेत.

**महत्त्वाकांक्षी प्रकल्प : कंपनीची आर्थिक स्थिती खराब**


# हलगर्जीचा अंबानींना फटका

■ कोस्टल रोड प्रकल्पाचे काम घेतले काढून ■ कामात उशीर होत असल्यामुळे निर्णय

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबई पालिकेसाठी महत्त्वाकांक्षी असलेल्या कोस्टल रोड प्रकल्प धीम्या गतीने सुरू आहे आणि याचाच फटका अनिल अंबानींना बसला आहे. अनिल अंबानींच्या रिलायन्स इन्फ्रास्टक्चरकडून हे काम काढून घेण्यात आले आहे.

कंपनीची आर्थिक स्थिती खराब असल्याचा परिणाम कोस्टल रोडच्या कामावर होत होता. धीम्या गतीने आणि हलगर्जी बाळगल्यामुळे राज्य सरकार आधीच नाराज होते, त्यामुळे अखेर हा प्रकल्प रिलायन्स इन्फ्राकडून काढून घेण्यात आला आहे.

अनिल अंबानी सातत्याने बिकट आर्थिक परिस्थितीतून जात आहे. अलीकडेच सेबीने देखील कोणत्याही कंपनीकडून आर्थिक व्यवहार आणि पैशाची देवाण-घेवाणवर स्थगिती आणली आहे.




### ५० टक्के काम पूर्ण

कोस्टल रोडचे काम नरिमन पॉईंट ते वांद्रेपर्यंत १०.५८ कि.मी.चा मार्ग ५० टक्के पूर्ण झाला आहे. परंतु, वांद्रे-वर्सोवादरम्यान खूप धीम्या गतीने काम सुरू आहे. या प्रकल्पाचे काम पालिकेच्या अंतर्गत होत आहे. तर कोस्टल रोडच्या इतर तीन फेजचेही काम वेगाने सुरू आहे. संपूर्ण प्रकल्पाचे काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. कोरोना संकटादरम्यानही कोस्टल रोडचे काम निर्बंधातही वेगाने सुरू होते. मुख्यमंत्रींचा ड्रीम प्रोजक्ट असल्यामुळे पालिकेने हा प्रकल्प पूर्ण करण्यावर जोर दिला आहे. प्रकल्पादरम्यान दुतर्फा वाहतुकीसाठी दोन बोगदे बनवण्यात येत आहेत, ज्यांची लांबी २.०७ कि.मी. आहे. पॅकेज चार अंतर्गत तयार होत असलेल्या बोगद्याचा आंतरिक व्यास ११ मीटरचा आहे. दुतर्फा प्रत्येक तीन लेन असणार आहेत. बोगद्याच्या रिक्लेमेशनचे काम ५५ टक्के पूर्ण झाले आहे. बोगद्याच्या बोरिंगचे काम ९ टक्के, बोगद्याच्या सेगमेंट कास्टिंगचे काम २३ टक्के, बॉक्टस कल्वर्टचे काम ६६ टक्के आणि ऑण्ड कव्हरचे काम ३८ पूर्ण झाले आहे.

### पाच वर्षांतही काम पूर्ण होण्याची आशा नाही

- १७.१७ कि.मी. लांबीच्या वांद्रे-वर्सोवा कोस्टल रोडचे काम रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर आणि इटलीच्या अस्ताल्दी एसपीएच्या संयुक्त भागिदारीतून सुरू होते. प्रकल्पावर ६०९९.९९ कोटींचा खर्च होता.
- कंपनीला ६० महिन्यांच्या आत काम पूर्ण करायचे होते, २०१९ मध्ये रिलायन्सला काम सुरु करण्यास परवानगी मिळाली होती.
- धीम्या गतीने काम पुढे सरकत असल्यामुळे पुढील पाच वर्षांतही काम पूर्ण होण्याची आशा नाही.
- कोस्टल रोडवर १२ हजार कोटींचा खर्च येणार असल्याचा अंदाज बांधण्यात आला होता, तो आता १७ हजार कोटींवर गेला आहे.

## ज्येष्ठाच्या हत्येप्रकरणी आरोपीला बेड्या



मुंबई, ज्येष्ठ नागरिकाची हत्या करून फरार झालेल्या आरोपीला क्राईम ब्रान्चच्या प्रॉपर्टी सेलने पनवेलमधून अटक केली आहे. पैशाच्या वादातून ही हत्या झाल्याचे समोर आले आहे. वडाळा पोलीस याप्रकरणी तपास करत आहेत. वडाळ्यात राहणारे लक्ष्मण घुगेने नातेवाई सुशांत राम सातपुतेला पैसे दिले होते. लक्ष्मणने सुशांतकडे आपल्या उधारीचे पैसे मागितले, यावर वाद झाला आणि सुशांतने लक्ष्मणवर काठीने हल्ला करून गंभीर जखमी केले आणि फरार झाला. वडाळा पोलिसांनी गंभीररित्या जखमी झालेल्या लक्ष्मणला सायन येथील रुग्णालयात दाखल केले, जेथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. वडाळा पोलिसांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

### सीसीटीव्हीची मदत

पोलिसांनी आरोपी सुशांत सातपुतेचा शोध घेण्यास सुरूवात केली, परंतु, तो पोलिसांच्या हाती लागला नाही. प्रॉपर्टी सेलचे प्रभारी पोलीस निरीक्षक शशिकांत पवार यांच्या पथकाने सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने आरोपीचा शोध घेत पनवेल रेल्वे स्थानकातून अटक करण्यात आली. पुढील तपासासाठी त्याचा ताबा वडाळा पोलिसांना देण्यात आला आहे.

## फरार गँगस्टरला अखेर बेड्या

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. झारखंडमधील एका गँगस्टरला पिस्तूल व स्फोटकांसह गुन्हे प्रकटीकरण शाखा पाचच्या पोलिसांनी अटक केली. तो मागील १५ दिवसांपासून मुंबईत राहत असल्याचे तपासात उघड झाले आहे.

झारखंडच्या छत्रा जिल्ह्यातील हयुल साहेबजान अंसारी हा गेल्या सहा महिन्यांसून बेपत्ता होता. एका कोळसा वाहतूक करणाऱ्या कंपनीतील व्यवस्थापकावर केलेल्या गोळीबारात तो गंभीर जखमी झाला होता. त्याला या आरोपीने पिस्तूल व अन्य साहित्याचा पुरवठा केला होता. त्यानुसार टंडवा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. तांत्रिक आधारावर त्याचा शोध सुरू केला असता मागील सहा महिन्यांपासून आपले नाव बदलत सतत अनेक ठिकाणी फिरत होता. झारखंड एटीएस, सायबर सेल पथक, तसेच स्थानिक टंडवा पोलिस ठाणेच्या पथकास हुलकावणी देत होता. झारखंड पोलिसांनी मुंबई पोलिस उपायुक्त, गुन्हे प्रकटीकरण शाखेशी संपर्क साधत आरोपीची माहिती दिली होती.

## जीएसटी घोटाळ्याप्रकरणी दोन जण अटकेत

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. महाराष्ट्र वस्तु व सेवा कर (जीएसटी) विभागाने १११ कोटीच्या कर घोटाळ्यात मोठे यश मिळाले असून अलीकडेच एका दाम्पत्याला अटक करण्यात आली आहे. यादरम्यान त्यांच्याकडून ४५० कोटींहून अधिक बोगस बिल मिळाले आहेत. दोन्ही आरोपींना शुक्रवारी सकाळी सुरतहून मुंबईत आणण्यात आले. त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. ही कारवाई मुंबई पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखा व सुरत शहर पोलिसांच्या सहकार्याने यशस्वी केली. त्यांनी वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावे बोगस कंपनी बनवून ८४२ रुपये बोगस बिल प्राप्त करून सुमारे १११ कोटी रुपयांची कर चोरी केली होती.

## लोकलमध्ये वायफायसाठी प्रतीक्षा



मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मध्य रेल्वेने एका खासगी कंपनीमार्फत दहा लोकल ट्रेनमध्ये निःशुल्क वायफाय सेवा देण्याची सुरुवात केली आहे. मात्र, सर्व लोकलमध्ये वायफाय लावण्यास तब्बल वर्षभर थांबावे लागणार आहे. कारण सेमी कंडक्टरचा तुटवडा असल्याने वायफाय बसवण्यास विलंब होणार आहे. त्यामुळे सर्व प्रवाशांना मोफत मनोरंजनासाठी आणखी वर्षभराची प्रतीक्षा करावी लागणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून सेमीकंडक्टरच्या तुटवड्यामुळे वाहन उद्योग आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु निर्मितीचा उद्योगाला मोठा फटका बसला आहे. वाहन निर्मितीसाठी मुलभूत मानल्या जाणाऱ्या सेमीकंडक्टरच्या तुटवड्यामुळे वाहन पुरवठ्यात घट झाली आहे. याचा फटका सुद्धा लोकल ट्रेनला बसणार आहे.

**विकासकांकडून निविदा मागवण्यात येणार**

## म्हाडा मुख्यालयाचा पुनर्विकास

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. वांद्रे येथील म्हाडा मुख्यालयाच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव म्हाडाने सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. हा प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत असतानाच आता म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून मुख्यालयाच्या पुनर्विकासासाठी इच्छुक विकासकांकडून लवकरच निविदा मागवण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### म्हाडाला मिळणार दोन इमारती

सध्या असलेल्या मुख्यालयाच्या ठिकाणी चार इमारती उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी म्हाडाला १७ मजल्यांच्या दोन इमारती मिळणार आहेत. या इमारतींमध्ये अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध असतील, असेही अधिकाऱ्याने सांगितले.

म्हाडा मुख्यालयाची इमारत जीर्ण झाली असून आतापर्यंत देखभाल-दुरुस्तीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाला आहे. सध्या इमारतीची बरीच कामे प्रगतिपथावर असल्याने प्रशासनाने इमारतीचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला आहे; मात्र म्हाडाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने पुनर्विकास खासगी विकसकांमार्फत करण्यात येणार आहे.

## ‘कामा’मध्ये होणार शस्त्रक्रिया




मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईतील महिला व मुलांसाठी प्रसिद्ध असलेले कामा रुग्णालयातील नियमित शस्त्रक्रिया या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बंद ठेवण्यात आल्या होत्या. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने निर्बंध शिथिल करण्यात येत आहेत. त्या पार्श्वभूमीवर या आठवड्यापासून कामा रुग्णालयातील नियमित शस्त्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात येणार आहेत. त्यामुळे दोन महिन्यांपासून शस्त्रक्रियेच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांना दिलासा मिळणार आहे.

मुंबईसह राज्यातील कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होऊ लागल्याने जानेवारीपासून निर्बंध अधिक कडक करण्यात आले होते. कोरोना रुग्णांची संख्या लक्षात घेता सेंट जॉर्ज, जीटी रुग्णालय हे कोविड समर्पित करण्यात आले, तर कामा रुग्णालयातही महिला रुग्णांना दाखल करण्यात येत होते. त्यामुळे कोरोनाची परिस्थिती लक्षात घेता मोठ्या व महत्त्वाच्या शस्त्रक्रिया वगळता सर्व शस्त्रक्रिया बंद ठेवण्यात आल्या होत्या.

ज्या रुग्णांवर औषधोपचाराच्या माध्यमातून शस्त्रक्रिया लांबणीवर टाकणे शक्य आहे, अशा रुग्णांना कोविड परिस्थिती आटोक्यात आल्यानंतर बोलवण्यात आले होते. त्यानुसार काही दिवसांपासून मुंबईतील कोरोना परिस्थिती आटोक्यात आल्याने आता कामा रुग्णालयातील सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### रुग्णांना मिळणार दिलासा

येत्या आठवड्यापासून शस्त्रक्रिया करण्यास सुरुवात करण्यात येणार आहे. शस्त्रक्रियेवेळी आवश्यक असणारी औषधे व उपकरणेही मागवण्यात आली आहे. शस्त्रक्रियेसाठीची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे दोन महिन्यांपासून शस्त्रक्रियेच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांना दिलासा मिळणार आहे. ओपीडीमध्ये येणाऱ्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी वेळ देण्यात येणार असून त्यादृष्टीने शस्त्रक्रियेचे नियोजन करण्यात येणार असल्याचे कामा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. तुषार पालवे यांनी सांगितले. कामा रुग्णालयात साधारणपणे दररोज १५० पेक्षा अधिक रुग्ण ओपीडीमध्ये उपचारासाठी येतात. तर ५० रुग्ण उपचारासाठी रुग्णालयात दाखल होत असतात. मात्र कोरोनाच्या काळामध्ये असलेल्या विविध निर्बंधामुळे कामा रुग्णालयातील ओपीडीत येणाऱ्या रुग्णांची संख्या कमी झाली आहे. तसेच रुग्ण दाखल होण्याची संख्याही रोडवली आहे. कोरोनाचे निर्बंध शिथिल होत असल्याने रुग्णालय पुर्णपणे सुरु होणार असल्याने रुग्णांना दिलासा मिळणार आहे.

## चार बोगस डॉक्टर अटकेत

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. बेकायदेशीरपणे अलोपॅथीची प्रॅक्टिस करणाऱ्या चार डॉक्टर आणि एका कंपाऊंडरला अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखेच्या युनिट - १० ने ही कारवाई केली आहे. पाचही आरोपी गोरेगाव पश्चिम येथील प्रेम नगर परिसरात गेल्या दोन वर्षांपासून प्रॅक्टिस करत आहेत. इब्रार सय्यद (२४), डॉ. सर्वेश यादव (३१), डॉ. छोटेलाल यादव (३३), डॉ. ओमप्रकाश यादव (४५) आणि डॉ. सपना यादव (२९) अशी या पाच जणांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रेम नगर येथील डॉ. मुकेश यादव यांच्या क्लिनिकमध्ये काम करणारा कंपाऊंडरला सय्यद हा डॉ यादव यांच्या अनुपस्थितीत रुग्णालयात प्रॅक्टिस करत होता.पोलिसांनी अन्य डॉक्टरांच्या पदव्या तपासल्या. तेव्हा आयुर्वेद आणि होमिओपॅथी मेडिसिन अँड सर्जरी (बीएचएमएस) पदवीचे प्रमाणपत्र त्यांच्याकडे होते.

**NOTICE**

Date : 13.02.2022

**Arbitration between**
**Shahu Omprakash Shinde**
..Claimant

AND

**Nikhil Vinod Kasbe**
Flat no. 23, 2nd Floor, Navbharat Bld. 48, Shanivar Peth, Pune-411030
.. Respondent

Dear Sir,

This is to inform you that as per the terms and conditions in between you both parties, the undersigned has been appointed as sole arbitrator by **Shahu Omprakash Shinde** (i.e. Claimant) to arbitrate in respect of the claim by the claimant against the respondent **Nikhil Vinod Kasbe.**

Kindly note that I have convened the first meeting of arbitration at my office at Aurangabad on 28th February 2022. at 11.30 a.m.

You are requested to remain present either in person or through your Advocate on the aforesaid date and time.

sd/-
**(Sujit S. Patil)**
Sole Arbitrator
Aurangabad

1. **Nikhil Vinod Kasbe**
Flat no, 23, 2nd Floor, Navbharat Bld. 48, Shanivar Peth, Pune-411030
2. **Shahu Omprakash Shinde**
N-6, Plot no. 1136, Sai Nagar, CIDCO, Aurangabad.

**चेक संलग्न फॉर्मची अदलाबदली**

## ‘आरटीजीएस’द्वारे फसवणूक

■ परस्पर ३ लाख खात्यात वळवले ■ आरोपीला बेड्या




मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राष्ट्रीयकृत बँकांमध्ये चेकसोबत संलग्नित आरटीजीएस फॉर्मची अदलाबदली करून फसवणूक करणाऱ्या भामट्याला साकीनाका पोलिसांनी शनिवारी अटक केली आहे. अन्वर खान असे आरोपीचे नाव असून तो राष्ट्रीयकृत बँकांच्या खुल्या ड्रॉप बॉक्समधील चेक संलग्नित आरटीजीएस फॉर्मची हेराफेरी करून स्वतःच्या खात्यावर पैसे वळते करत होता. हुबहुब सही करून बँक कर्मचाऱ्यांच्याही डोळ्यात धुळफेक करत फसवणूक करत होता. मिळालेल्या माहितीनुसार, साकीनाका पोलिसांनी यासंदर्भातील सीसीटीव्ही फुटेज पोलीस ठाण्यांच्या व्हॉट्सअॅपवर पाठवले असून इतर ठाण्यांमध्ये अशा गुन्ह्यांची नोंद आहे की नाही, याची शहानिशा करण्यात येत आहे. त्यानुसार अंबोली आणि जोगेश्वरी पोलीस ठाण्यात असेच एक प्रकरण समोर आल्याची माहिती पोलीस निरीक्षक धीरज गावरे यांनी दिली. अंधेरी पूर्वेतील बालाजी इंजिनिअरिंग स्टील कॉर्पोरेशनचा चेक दुसऱ्या खात्यामध्ये डेबिट झाल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार केली. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. १२ जानेवारीला त्यांच्या खात्यातून ३ लाख इतर खात्यात डेबिट झाले होते. तक्रारदारांनी त्यांच्याच खात्यातील ३५ लाख इतर खात्यात वळते करण्यासाठी आरटीजीएस फॉर्मसह चेक ड्रॉप बॉक्समध्ये टाकला होता. परंतु, ३५ लाख ट्रान्सफर होण्याऐवजी त्यांच्या खात्यातून ३ लाख डेबिट झाले. याबाबत पोलिसांनी बँक कर्मचाऱ्यांची चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, आम्ही चुकून ३५ लाखांऐवजी केवळ ३ लाखच ट्रान्सफर केले, जे की आरटीजीएस फॉर्मवर नमूद होते. परंतु, पोलिसांनी जेव्हा आरटीजीएस फॉर्म तपासला तेव्हा त्यावरील खाते नंबर आणि नमूद खाते नंबर वेगवेगळे आढळून आले.

### खाते क्रमांकही बोगस

- पोलिसांनी संबंधित खाते क्रमांक तपासला असता तो यस बँकेतील कोत्यायंग भूषण यांचा आढळला आणि त्याची चौकशी केली असता तोही बनावट निघाला.
- पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यांना १२ जानेवारीला दुपारी १ ते ३ च्या दरम्यान एक इसम ड्रॉप बॉक्स खोलत असल्याचे आढळले. त्यांना तो इसम चेक आत टाकण्याऐवजी फॉर्मशी जोडलेला चेक काढताना आढळला.

### कर्मचाऱ्यांच्या समोरच घडला प्रकार

अधिक बारकाईने तपासणी केल्यावर, अधिकाऱ्यांना आढळले की आरोपीने बालाजी इंजिनिअरिंग स्टील कॉर्पोरेशनने जमा केलेल्या चेकमधून आरटीजीएस फॉर्म वेगळा केला आणि आरटीजीएस फॉर्मच्या जागी दुसरा खाते क्रमांक समाविष्ट केला. आरोपींनी फॉर्मवरील स्वाक्षरी देखील कार्बनाइज केली. बँक कर्मचाऱ्यांच्या ते लक्षात आले नाही, असे गवारे म्हणाले.

**श्री. अजित वामन निकम, विशेष वसुली अधिकारी,**
**सहकार खाते, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय**
द्वारा :- अभयलक्ष्मी को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.,
१/१०७, सिध्दिविनायक को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.,
‘बी’ विंग, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई - ४०० ०११.
दिनांक : ०८/०२/२०२२

**नमुना - झेड**
**महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ चा उपनियम ११(ड-१) नुसार**
**स्थावर मालमत्तेकरीता ताबा सूचना**

ज्याअर्थी खाली सही करणार हे अभयलक्ष्मी को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि., मुंबई चे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये विशेष वसुली अधिकारी असून सौ. प्रेरणा शैलेश जाधव कसुरदार (लवादी थकबाकीदार) यांच्याविरुद्ध प्राप्त झालेल्या वसुली दाखला नं. अनुक्रमे ३५३५/२०२०, ३५३६/२०२० व ३५३७/२०२० दिनांक १३/०३/२०२० च्या त्यांना थकीत कर्जबाबत वसुली कार्यवाही संदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम १०७ (३) अन्वये मागणी (डिमांड) नोटीस दि.३१/१२/२०२० रोजी पारीत करुन नोटीशीतील एकूण रक्कम अनुक्रमे रु. ५,५२,९४५/-, रु. ५,५२,९४५/- व रु. ५,५२,९४५/- एकूण रक्कम रुपये १६,५८,८३५/- (अक्षरी रुपये सोळा लाख अठ्ठावीस हजार आठशे पत्तीस मात्र) परत करण्यासाठी नोटिसा मिळाल्यापासून १५ दिवसांत भरणा करण्यास नोटीसने कळविले होते.

ज्याअर्थी सौ. प्रेरणा शैलेश जाधव लवादी थकबाकीदार (कसुरदार) यांनी सदर रक्कम परत करण्यास कसुर केली असल्यामुळे खाली सही करणार यांनी दि. २२/०६/२०२१ रोजी जप्तीपूर्वीची अंतिम नोटीसा व दिनांक १४/०८/२०२१ रोजी जप्तीची नोटीसा पाठवून खाली नमूद केलेली मालमत्ता जप्त केलेली आहे.

ज्याअर्थी सौ. प्रेरणा शैलेश जाधव लवादी थकबाकीदार (कसुरदार) यांनी वरील मागणी नोटीसीत दर्शवलेली रक्कम संस्थेस परत न केल्यामुळे कसुरदार यांना व जनतेला सूचना देण्यात येते की, खाली सही करणार यांनी खालील नमुद केलेली सौ. प्रेरणा शैलेश जाधव लवादी थकबाकीदार (कसुरदार) यांचे स्थावर मालमत्तेचा ताबा-कब्जा दि.०८/०२/२०२२ रोजी मी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम १०७ चा उपनियम ११(ड-१) नुसार असलेल्या अधिकारात घेतला आहे.

विशेषत : सदर कब्जेदारास, कसुरदारांना (लवादी थकबाकीदार) व इतर सर्व जनतेला येथे सावधगिरीची सूचना देण्यात येते की, सदर स्थावर मालमत्तेसंबंधी कोणतेही व्यवहार करु नयेत व सदर स्थावर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार हा अभयलक्ष्मी को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि., मुंबई यांच्या दिनांक ०७/०२/२०२२ पर्यंतच्या कर्ज येणे बाकी व त्यावरील व्याज तसेच सरचार्ज सह बोजा रक्कम रु. १६,७२,१०४/- (अक्षरी रुपये सोळा लाख बाहत्तर हजार एकशे चार मात्र) रकमेच्या अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन/तपशील :-**
**पत्ता :- प्लॅट नं. ११०४, ई विंग, रहेजा विस्टा, फेज - २, मोहम्मद वाडी, पुणे - ४११०६०**
**दिनांक : ०८/०२/२०२२**
**ठिकाण : पुणे.**

**श्री. अजित वामन निकम**
**विशेष वसुली अधिकारी, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य**
**द्वारा :- अभयलक्ष्मी को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.,मुंबई**
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)**

## इंटरमिजिएट परीक्षा ऑनलाईन

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. विद्यार्थ्यांमधील कलेला वाव देणाऱ्या रेखाकला परीक्षेतील इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा २२ व २३ फेब्रुवारीला ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय कला संचालनालयाकडून घेण्यात आला आहे. ही परीक्षा ऑनलाईनऐवजी ऑफलाईनच घेण्यात यावी, अशी मागणी करत महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाकडून कला संचालनालयाच्या निर्णयाला विरोध करण्यात आला आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आल्याने दहावी, बारावीच्या परीक्षा ऑफलाईन होत असताना इंटरमिजिएट परीक्षा ऑनलाईन घेण्याचा संचालनालयाचा अट्टाहास का? असा प्रश्न महामंडळाकडून उपस्थित करण्यात आला आहे.



### परीक्षा शुल्का दुपटीने वाढ

शैक्षणिक वर्षे २०२१-२२ मध्ये इयत्ता दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची फक्त इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा २२ व २३ फेब्रुवारीला ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी १२ ते २० फेब्रुवारीपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाईन नोंदणी करायची आहे. परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने विद्यार्थ्यांना ड्रॉईंग पेपर, रंग साहित्य, मोबाईल नेट पॅकसाठी स्वत: खर्च करावे लागणार आहेत. परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत असतानाही कला संचालनालयाकडून यंदा परीक्षा शुल्कात दुपटीने वाढ केली आहे.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदा**
**चौथी मुदत वाढ**

सोलापूर महानगर पालिका, शासन मंजूर नगर रचना योजना क्रमांक ०४ अंतीम भूखंड क्रमांक ८९ म न पा शाळा क्रमांक २७ येथील तिसरा, चौथा व पाचवा मजल्याचे बांधणे याकामाकरीता ई-निविदा क्रं. Tender Id २०२१_smc_७३६८०४_१ सदर कामाचे जाहिर प्रसिध्दीकरण (ई-निविदा) ऑनलाईन पध्दतीने करणेत येत आहे.

टेंडर नोटीस नंबर ई-निविदा क्र. Tender Id २०२१_smc_७३६८०४_१

या कामाचे ई-टेंडर मा. महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत http://www.mahatenders.gov.in तसेच (नोटीसीची प्रत www.solapurcorporation.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे. या संकेतस्थळावर दि. १५/०३/२०२२ पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

**Tricom Fruit Products Ltd**
Regd. Office: Gat No 336,338-341, Village AndoriTalukaKhandale, Shirval, Pandarpur Road, DistSatara- 415521.CIN L67120PN1995PLC139099
(Rs. In Lakhs)

| Particulars | Unaudited | | Audited |
|---|---|---|---|
| | Quarter Ended 31.12.2021 | Quarter Ended 31.12.2020 | Year Ended 31.03.2021 |
| Total Income from Operation (net) | - | - | - |
| Net Profit/ (Loss) for the period from discontinuing operation (before tax, Exceptional and /or Extraordinary items) | (1.81) | (53.70) | (2706.22) |
| Net Profit/ (Loss) for the period from discontinuing operation before tax(after Exceptional and/or Extraordinary items) | (1.81) | (53.70) | (2706.22) |
| Net Profit/ (Loss) for the period from discontinuing operation after tax(after Exceptional and/or Extraordinary items) | (1.81) | (53.70) | (2706.22) |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and other Comprehensive Income (after tax)] | (1.81) | (53.70) | (2706.22) |
| Equity Share Capital | 1909.41 | 1909.41 | 1909.41 |
| Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Audited Balance Sheet of the previous year) | - | - | - |
| Earning Per share (of Rs.10/- each ) (for continuing and discontinued operations) | | | |
| 1. Basic: | (0.01) | (0.28) | (14.17) |
| 2. Diluted: | (0.01) | (0.28) | (14.17) |

**Note:**
The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with Stock Exchanges under Regulation 33 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements)Regulations, 2015. The full format of Standalone Financial Results are available on the website of the Company at www.tricomfruitproduts.com and on the website of Stock Exchange i.e. www.bseindia.com

Place :- Mumbai
Date: 14.02.2022

For Tricom Fruit Products Ltd
sd/-
Chandrakant Joshi
(DIN: 08398213) Managing Director